डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै,2018 पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा: 1)शासन वित्त विभाग निर्णय क्र.मभवा.1319/प्र.क्र.13/सेवा-9, दिनांक: 08 जुलै,2019.

## आदेश

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/2019-20/1509. दिनांक :15/07/2019

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक 08 जुलै,2019 अन्वये सुधारीत वेतनश्रेणीत असणारे अधिकारी/कर्मचारी व पुर्णकालीन अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक 1 जुलै, 2018 पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक 1 जुलै, 2018 पासून 6 % दराने अनुज्ञेय महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या 142 % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे एकूण वेतनाच्या 148 % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना यांना दिनांक 1 जुलै,2018 पासुन ते दिनांक 30 जून, 2019 पर्यंतच्या महागाई भत्याची वाढ रोखीने देण्यात यावी.

सदरहू महागाई भत्याची वाढ **जुलै-2019** ची महागाई भत्याची देयके माहे **जुलै -2019 देय ऑगस्ट-2019** चे नियमित मासिक वेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन **2019-20** चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत **2019-20** करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

**मा. कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने........**

नियंत्रक

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

प्रति:1) नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).--------------------

2) प्राचार्य ____________________

3) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

4) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 134
Dt.: 16-07-19

RMR Budget/DA/New